महाराष्ट्रातील जनतेचा आक्रोश, दैनिक नांदगांव

# आवाज

संपादक : भगवान सोनवणे

WWW.DAILYAWAZ.COM

RNI Reg. No.: MAHMAR/2014/66104 ■ वर्ष - १२ वे ■ अंक क्र. - ८२ ■ शुक्रवार दि. ०३ ऑक्टोंबर २०२५ ■ किंमत - १ रूपया ■ पाने - ४

आपला व्यवसाय वृध्दिंगत होण्यासाठी दैनिक आवाजमध्ये जाहिरात करण्याची सुवर्णसंधी!
एक महिना - २४९९/- रु.
तीन महिने - ५९९९/- रु.
सहा महिने - ९९९९/- रु.
* संपादक *
मो. क्र. ९५४५९१०१७७/८९९९९२१९९४

## गोवा बनावटीची विदेशी दारुची अवैधरीत्या वाहतूक करणाऱ्या विरोधात धडक कारवाई

### २ कोटी २६ लाख ६५ हजार रुपये किमतीचा मुद्देमाल आरोपींकडून जप्त

**दै. आवाज वृत्तसेवा...**

नाशिक- मिळालेल्या गुप्त बातमीनुसार सिन्नर नाशिक रोडवर शिंदे पळसे टोल नाक्याजवळ शिंदे गाव येथे महाराष्ट्र दारूबंदी कायद्यानुसार वाहन तपासणी सा-पळा रचला असता आज दिनांक दोन रोजी संशयित एक टाटा कंपनी निर्मित २५१८ मॉडेल चे दहा चाकी वाहन तपासणी कमी थांबवले असता सदर वाहनाच्या पुढील दर्शनी बाजूस आर जे १४ जी एफ ३०१९ असा प्रादेशिक परिवहन क्रमांक नमूद होता. सदरचे वाहनांमध्ये पर राज्यातील गोवा बनावटीच्या विदेशी मध्याच्या रॉयल ब्ल्यू व्हिस्की १८० मिली क्षमतेच्या एकूण ९६००० सीलबंद बाटल्या २००० बॉक्स मध्ये आढळून आल्याने वाहन चालक मांगीलाल रामकिसन वय ३० वर्ष राहणार खिलेरी वास मगरा चोहटन बारमेर राजस्थान याचे विरुद्ध महाराष्ट्र दारूबंदी अधिनियम १९४९ अंतर्गत गुन्हा नोंदविण्यात आला सदरील परराज्यातील गोवा बनावटीचे विदेशी मध्य आणि तो मध्य साठा वाहतूक



करणारे टाटा कंपनी चे वरील क्रमांकाचे दहा चाकी वाहन असा एकूण रुपये दोन कोटी २६ लाख ६५ हजार रुपये किमतीचा मध्यमाल जप्त करण्यात आला.

ही कारवाई राज्य उत्पादन शुल्कचे आयुक्त डॉ. राजेश देशमुख, सह आयुक्त प्रसाद सुर्वे, विभागीय उपायुक्त श्रीमती उषा वर्मा मॅडम, अधीक्षक संतोष झगडे उपाधीक्षक सुअ तांबारे यांच्या मार्गदर्शनाखाली भरारी पथक क्रमांक एक चे निरीक्षक विलास बामणे दुय्यम निरीक्षक गणेश नागरगोजे, संजय सावंत, सदुनी पी वाय गायकवाड, जवान सर्वश्री दीपक आव्हाड अमित गांगुर्डे संदीप देशमुख व्ही ए चव्ह-ाण, सागर पवार अमन तडवी महिला जवान अनिता भांड यांनी सर्वांनी मिळून यशस्वीरित्या पार पाडली. सदर गुन्ह्याचा तपास गणेश नागरगोजे करीत आहेत.

अवैध मद्य निर्मिती विक्री वाहतूक या बाबत तक्रारीसाठी मो क्र. ८४२२००११३३

## सिन्नर तालुक्यात अतिवृष्टीमुळे १२ हजार ९० हेक्टरवरील खरीपाच्या पिकांचे नुकसान

**दै. आवाज वृत्तसेवा...**

नाशिक - सिन्नर तालुक्यात नुकत्याच झालेल्या अतिवृष्टीमुळे १२ हजार ९० हेक्टरवरील खरीपाच्या पिकांचे नुकसान झाल्याचा प्राथमिक अंदाज महसूल विभागाने वर्तविला आहे. यामुळे १८,९०५ शेतकरी या बाधित झाले असून, ३ ऑक्टोबरपर्यंत नुकसानीचे पंचनामे पूर्ण करण्याचे आदेश तहसीलदार सुरेंद्र देशमुख यांनी दिले आहेत. दुसरीकडे बागलाण तालुक्यातील तब्बल १५१ गावे प्रभावित झाली असून, एकूण ३४,७२० शेतकरी आणि अंदाजे २४,११८ हेक्टर क्षेत्र पावसामुळे बाधित झाले आहे. सिन्नर तालुक्यातील पांढुर्ली, देवपूर, वावी, शहा, नांदूरशिंगोटे, सोनांबे, नायगाव, पांगरी बुद्रुक मंडळात अधिक पाऊस झाल्यामुळे या मंडळांतील मका, बाजरी, सोयाबीन, भाजीपाला या पिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. कोरडवाहू सोबतच बागायती आणि फळपिकांची शेतीही पावसाने बाधित झाली आहेत. नायगाव, नांदूरशिंगोटे, शहा, वावी, दे-वपूर परिसरात खरिपाच्या पिकांना मोठ्या प्रमाणात फटका बसला.

बागलाण तालुक्यात कांदा रोपे, मका, सोयाबीन, बाजरी, डाळिंब बागा, टोमॅटो या पिकांची व फळपिकांची मोठी हानी झाली आहे. नुकसानीमुळे शेतकरी तहसील कार्यालय तसेच कृषी विभागाच्या दारी धाव घेत तातडीने पंचनामे करून नुकसान भरपाई देण्याची मागणी करीत आहेत. संपूर्ण तालुक्यात पुढील हंगामातील पेरणीवरदेखील परिणाम होण्याची भीती व्यक्त केली जात आहे.

दिंडोरी : तालुक्यात अतिवृष्टीमुळे शेतीचे प्रचंड नुकसान झाले आहे. तीन दिवसांपूर्वी १०० मिमीपेक्षा अधिक पाऊस झाल्याने पिके नासली आ-हेत. तालुक्यातील द्राक्षबागांत मोठ्या प्रमाणावर पाणी साचले असून, सोयाबीन, भात, टोमॅटो, ऊस आदी पिके पूर्णत: पाण्याखाली गेल्याने शेतकऱ्यांवर मोठे संकट कोसळले आहे. अन्न व औषध प्रशासन मंत्री तथा दिंडोरीचे आमदार नरहरी झिरवाळ यांनी तहसीलदारांच्या दालनात प्रांतधिकारी आप्पासाहेब शिंदे तहसीलदार मुकेश कांबळे यांच्या उप-स्थितीत बैठक घेत तातडीने पंचनामे करण्याच्या सूचना दिल्या. दरम्यान वस्तुनिष्ठ पंचनामे करावेत, अशी मागणी 'कादवा'चे चेअरमन श्रीराम शेटे यांनी केली.

## शिक्षकांनी विद्यार्थ्यांना अधिक सक्षम करण्यास कटिबद्ध व्हावे - राज्यमंत्री डॉ. पंकज भोयर

**दै. आवाज वृत्तसेवा...**

नागपूर : भविष्यातील आव्हानांना ओळखून स्पर्धेच्या युगात समर्थ ठरणाऱ्या पिढींना घडवण्याची जबाबदारी समाज व पालकांसमवेत शिक्षकांचीही आहे. यादृष्टीने प्रत्येक शाळा व शिक्षकांनी बदलत्या काळानुसार नवनविन तंत्रज्ञान व ज्ञान शाखांचा अभ्यास करुन त्याबाबतही विद्यार्थ्यांच्या मनात ज्ञानाची उत्सुकता वाढविण्यासाठी पुढाकार घ्यावा, असे आवाहन शालेय शिक्षण राज्यमंत्री डॉ. पंकज भोयर यांनी केले.

रविभवन येथे विविध शैक्षणिक संस्था व शिक्षक संघटनांच्या प्रतिनिधीसमवेत आयोजित करण्यात आलेल्या बैठकीत ते बोलत होते. या बैठकीस शालेय शिक्षण



विभागाचे प्रधान सचिव रणजीतसिंह देओल, शिक्षण आयुक्त सचिंद्रप्रताप सिंह, माध्यमिक शिक्षण संचालक डॉ. महेश पालकर, प्राथमिक शिक्षण संचालक शरद गोसावी यांनी दूरदृश्य प्रणालीद्वारे सहभाग घेतला. याचबरोबर शिक्षण उपसंचालक डॉ. माधुरी सावरकर, सहाय्यक संचालक दिपेंद्र लोखंडे, महाराष्ट्र राज्य प्राथमिक शिक्षक समिती, एकनाथ स्वाभीमानी शिक्षक संघटना, विदर्भ प्राथमिक माध्यमिक शिक्षक संघ, शिक्षक भारती संघटना, खाजगी शाळा शिक्षक संघ, अंजुमन इशाद ए तालीब संस्था, अखिल भारतीय ऊर्दू शिक्षक संघ यांचे प्रतिनिधी उपस्थित होते. आपल्या शैक्षणिक सुविधेत व गुणवत्तेत सुधारणा व्हावी यादृष्टीने पीएम श्री शाळांच्या धर्ती-वर महाराष्ट्रात सीएम श्री शाळा अभियान हाती घेत असल्याचे सूतोवाच त्यांनी केले. या अभियानाद्वारे शासकीय शाळांबद्दल सुविधा व गुणवत्तेच्या माध्यमातून नवा विश्वास निर्माण होईल. यात शासन मूलभूत, भौतिक व शैक्षणिक सुविधा उपलब्ध करुन देण्यासमवेत शिक्षकांनाही आवश्यकते प्रशिक्षण देऊन व्यापक परिवर्तन साध्य करु इच्छित असल्याचे राज्यमंत्री डॉ. भोयर यांनी सांगितले. १३ फेब्रुवारी २०१३ च्या शासन निर्णयानुसार राज्यात शिक्षकांसाठी धोरणात्मक बाब म्हणून टीईटी परीक्षा अनिवार्य केली आहे. या बाबत विविध शिक्षक संघटनांनी व्यक्त केलेल्या मतानुसार व मागणीनुसार हा निर्णय २०१३ पूर्वीच्या शिक्षकांना पूर्वलक्षी प्रभावाने लागू करणे न्यायोचित होणार नाही. सवोच्च न्यायालयाने याबाबत नुकत्याच दिलेल्या निकालाचा विचार करुन शासनातर्फे रिव्ह्यूव पिटीशन दाखल करण्याबाबत लवकरच वरिष्ठ पातळीवर विचार विनिमय करुन निर्णय घेऊ असे त्यांनी स्पष्ट केले.राज्यात अतिवृष्टीमुळे सर्व जिल्हे विविध आव्हांनाना सामोरे जात आहेत. शेतकऱ्यांपुढे मोठा प्रश्न निर्माण झाला आहे. महाराष्ट्र शासन शेतकऱ्यासमवेत खंबीरपणे उभे असून सर्वांनी शेतकऱ्यांसोबत तेवढ्याच खंबीरपणे उभे राहण्याची गरज आहे, असे राज्यमंत्री डॉ. पंकज भोयर यांनी विविध संघटनांना सागून शिक्षकांनी अशा स्थितीत आंदोलनाची भूमिका घेऊ नये, असे आ-वाहन आवाहन त्यांनी केले.

## राज्यात भू-करमापक संवर्गातील ९०३ पदांची भरती

**दै. आवाज वृत्तसेवा...**

पुणे : भूमी अभिलेख विभागातील 'गट क' भू-करमापक संवर्गातील ९०३ रिक्त पदे भरण्यासाठी परीक्षेचे आयोजन करण्यात येणार असून १ ते २४ ऑक्टोबर २०२५ पर्यंत ऑनलाईन अर्ज करण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

राज्यात भू-करमापक संवर्गातील एकूण १ हजार १६० पदे रिक्त असून त्यापैकी ९०३ पदे सरळसेवेने भरण्यात येणार आहेत. यामध्ये पुणे विभागातील ८३ पदे, कोकण (मुंबई) विभाग - २५९, नाशिक - १२४, छ. संभाजीनगर - २१०, अमरावती - ११७ आणि नागपूर विभागातील ११० पदांचा समावेश आहे.

उमेदवारांचे अर्ज https://ibpsreg.ibps.in/gom-sep25/ Am{U https://mahabhumi.gov.in या संकेतस्थळांवर ऑनलाईन स्वीकारण्यात येणार आहेत. सदर भरतीसाठी १३ व १४ नोव्हेंबर २०२५ रोजी ऑनलाईन परीक्षा घेण्यात येणार आहे.

परीक्षेसाठीची पात्रता :

मान्यताप्राप्त महाविद्यालयातील किंवा संस्थेकडील स्थापत्य अभियांत्रिकी पदविका (डिप्लोमा इन सिव्हिल इंजिनिअरींग) धारक, किंवा माध्यमिक शालांत परीक्षेनंतर मान्यताप्राप्त औद्योगिक प्रशिक्षण संस्थेचे सर्वेक्षक व्यवसायाचे प्रमाणपत्र (आयटीआय सर्व्हेअर) धारक उमेदवारांना अर्ज करता येईल.

आयोजित करण्यात येणाऱ्या परीक्षेत मिळालेल्या गुणांच्या आधारे विभागनिहाय सर्वसाधारण गुणवत्ता यादी प्रसिद्ध केली जाईल. त्यानंतर सामाजिक व समांतर आरक्षणानुसार कागदपत्र पडताळणी करून विभागनिहाय अंतिम निवड यादी व प्रतीक्षा यादी जाहीर करण्यात येईल, असे राज्याचे जमाबंदी आयुक्त आणि संचालक भूमि अभिलेख डॉ. सुहास दिवसे यांनी कळविले आहे.

## मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची ड्रॅगन पॅलेस टेम्पलला भेट

नागपूर : मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी कामठीतील ड्रॅगन पॅलेस टेम्पलला भेट दिली. मुख्यमंत्री फडणवीस यांनी भगवान गौतम बुद्धांच्या मूर्तीला तसेच महामानव भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना अभिवादन केले व आयोजित बुद्ध वंदनेत सहभाग घेतला.

यावेळी महसूल मंत्री तथा पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे, माजी मंत्री अ‍ॅड. सुलेखा कुंभारे, जिल्हाधिकारी डॉ. विपिन इटनकर उपस्थित होते. सर्वांना धम्मचक्र प्रवर्तन दिनाच्या मन:पूर्वक शुभेच्छा देत मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, ड्रॅगन



पॅलेस टेम्पल आज आंतरराष्ट्रीय स्थळ झाले आहे. आता ड्रॅगन पॅलेसची जगभरात ओळख निर्माण होत आहे. परदेशातूनही अनेक नागरिक येथे येऊन बुद्धवंदनेत सहभागी होत असतात.



**दै. आवाज वृत्तसेवा...**

विंचूर - प्रतिवार्षिक नवरात्र उत्सवा निमित्ताने विंचुर जवळील विष्णुनगरच्या कुशीत विराजमान ग्रामदेवता कमळाई मातेच्या दर्शनासाठी शिवमुद्रा ग्रुपच्या सुमंगल नगर विंचुर येथील महिला मंडळ दरवर्षी नित्यनेमाने पहाटे पायी दर्शन व आरतीसाठी उपस्थित राहतात.या हि वर्षी मोठ्या उत्साहात या महिला सहभागी झाल्या होत्या.

# डॉ. संकेत महाजन यांचे किड नियंत्रणावर महत्वपुर्ण संशोधन

**दै. आवाज वृत्तसेवा...**

विंचूर - येथील डॉ संकेत शेखर महाजन या शेतकरी पुत्राने भात शेतीतील किड नियंत्रणावर महत्त्वपूर्ण असे संशोधन केले असून त्यांच्या एकात्मिक किटक व्यवस्थापन मॉड्यूलमुळे शेतकऱ्यांना त्याचा थेट फायदा होणार आहे. डॉ. संकेत महाजन यांनी भात शेतीतील सखोल संशोधना बद्दल सॅम हिग्गीन बॉटम कृषी तंत्रज्ञान आणि विज्ञान विश्वविद्यालय प्रयागराज येथून नुकतीच पीएचडी पदवी संपादन केली आहे. त्यांनी सिंथेसिस अँड डेव्हलपमेंट ऑफ प्लान्ट प्रोटेक्शन मॉड्यूल फॉर देअर इफेक्टीव्हनेस अगेन्स्ट इनसेक्ट पेस्ट कॉम्प्लेक्स ऑफ प्याडी अंडर सेंट्रल प्लेन अँग्रो क्लायमेटीक झोन ऑफ उत्तर प्रदेश असा होता.



डॉ. महाजन यांनी भात शेतीत एकात्मिक किटक व्यवस्थापन प्रणाली विकसित करण्यासाठी बीजप्रक्रिया ते काढणीपर्यंत विविध वनस्पती संरक्षण मॉड्यूलची निर्मिती केली. भारतातील भात हे प्रमुख अन्नधान्य असून देशाच्या अन्नसुरक्षेचा पाया या पिकावर आहे. परंतू गेल्या काही वर्षात बदलत्या हवामानामुळे व वाढत्या किड रोग प्रादुर्भावामुळे भात उत्पादनावर गंभीर संकट उभे राहिले आहे.बासमती व बहुगुणकारी काला नमक या जातींना होणाऱ्या किड प्रादुर्भावामुळे शेतकऱ्यांना नुकसान सहन करावे लागत आहे.ही समस्या लक्षात घेऊन व चाचणी केली.सलग दोन वर्षे उत्तर प्रदेशातील मध्य मैदानी प्रदेशात प्रयोगात्मक प्रात्यक्षिके घेऊन या मॉड्यूलची कार्यक्षमता सिद्ध करण्यात आली. संशोधनामुळे शेतकऱ्यांचा उत्पादन खर्च कमी होऊन उत्पादनात वाढ होणार आहे.प्रा.डॉ. अश्विनी कुमार, डॉ अनुराग तायडे,प्रा डॉ सुनिल झकारीया,प्रा. डॉ.अजित पौल यांचे मार्गदर्शन लाभले.

# पालकमंत्री जयकुमार गोरे यांच्या हस्ते २५ घंटागाड्यांचे लोकार्पण

**दै. आवाज वृत्तसेवा...**



सोलापूर, दि. ०२ (जिमाका): सोलापूर महानगरपालिकेस जिल्हा नियोजन समितीच्या (DPC) निधीतून मंजूर झालेल्या ३८ घंटागाड्यांपैकी पहिल्या टप्प्यात खरेदी करण्यात आलेल्या २५ घंटागाड्यांचे लोकार्पण आज महापालिकेच्या इंद्रभुवन येथे ग्रामविकास मंत्री तथा सोलापूरचे पालकमंत्री जयकुमार गोरे यांच्या हस्ते झाले.यावेळी आमदार देवेंद्र कोठे, जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद, महापालिका आयुक्त सचिन ओम्बासे, जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधिकारी कुलदीप जंगम, अतिरिक्त आयुक्त श्रीमती वीणा पवार व संदीप कारंजे, उपायुक्त आशिष लोकरे, सहाय्यक आयुक्त शशिकांत भोसले, मुख्य सफाई अधीक्षक नागनाथ बिराजदार, सफाई अधीक्षक अनिल चराटे, विद्युत विभागाचे कार्यकारी अभियंता राजेश परदेशी, मुख्य आरोग्य निरीक्षक नागेश मेंडगुळे यांच्यासह महापालिकेचे अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

पालकमंत्री गोरे यांच्या अध्यक्षतेखालील जिल्हा नियोजन समितीच्या निधीतून सोलापूर शहर स्वच्छ व सुंदर करण्याच्या उद्देशाने महानगरपालिकेस एकूण ३८ घंटागाड्यांची मंजुरी देण्यात आली आहे. यापैकी २५ गाड्यांचे आज लोकार्पण करण्यात आले असून उर्वरित गाड्यांची खरेदी लवकरच पूर्ण होणार आहे.

यामुळे शहरातील कचरा संकलन व्यवस्थेत अधिक गती येणार असून 'दरवाजा-दरवाजा कचरा संकलन' उपक्रम अधिक प्रभावीपणे राबवता येणार आहे. नागरिकांना वेळेत व सुटसुटीत सेवा मिळेल, तसेच शहर स्वच्छता मोहिमेला बळकटी मिळून सोलापूर हे स्वच्छ, सुंदर आणि आरोग्यदायी शहर बनविण्याच्या दिशेने हे एक महत्त्वपूर्ण पाऊल ठरणार असल्याचे त्यांनी सांगितले.

# रोबोटिक्स,ऑटोमेशन क्षेत्रात संशोधनासाठी मोठ्या संधी - प्राचार्य डॉ. देवकर

## एसएनडी अभियांत्रिकी महाविद्यालयात रोबोटिक्स अ‍ॅण्ड मेकॅट्रॉनिक्स कार्यशाळा

**दै. आवाज वृत्तसेवा...**






लक्ष्मण घुगे राजापूर प्रतिनिधी रोबोटिक्स आणि ऑटोमेशन क्षेत्रात संशोधनासाठी भरपूर संधी आहेत. तंत्रज्ञान वेगाने प्रगती करत आहे.प्राध्यापकांनी नवीन तंत्रज्ञान आत्मसात करतानाच भावी अभियंत्यांना देखील त्याचा लाभ मिळवून द्यावा असे प्रतीपादन पुणे येथील शरदचंद्र पवार अभियांत्रिकी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. संजय देवकर यांनी केले. बाभुळगाव येथील जगदंबा शिक्षण संस्थेच्या एस.एन.डी.अभियांत्रिकी महाविद्यालय आणि संशोधन केंद्र व एआयसीटीई अटल मार्फत रोल ऑफ रोबोटिक्स ऍण्ड मेकॅट्रॉनिक्स ईन इंडस्ट्री यावर सहा दिवसीय एआयसीटीई डेव्हलपमेंट ऑनलाईन कार्यशाळा यशस्वीपणे संपन्न झाला.यावेळी देशभरातून सहभागी २५० हुन अधिक प्राध्यपकांना मार्गदर्शन करताना श्री. देवकर बोलत होते.

यावेळी संस्थेचे संचालक रुपेश दराडे,प्राचार्य डॉ. डी.एम.यादव यांची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी प्राचार्य डॉ. यादव म्हणाले कि, औद्योगिक प्रक्रिया, डेटा हाताळणी आणि ग्राहक सेवा यांसारख्या क्षेत्रात मानवी कार्यांना मदत करण्यासाठी आणि त्यांची जागा घेण्यासाठी रोबोट्स आणि स्वयंचलित प्रणालींचा वापर वाढत आहे. त्यामुळे संशोधनास खूप वाव असल्याने प्राध्यापक- विद्यार्थ्यांनी त्याचा फायदा घ्यावा. सहा दिवसात विविध नामवंत तज्ञांचे तेरा ऑनलाईन सत्र झाले.यात डॉ हितेश ठाकूरे यांनी रिसेन्ट ट्रेण्ड्स एन ऑटोमोबाईल ऍण्ड रोबोटिक्स,प्रतीक काकडे यांनी सीएई ऍण्ड व्हर्चुअल टेस्टिंग, प्रणव लाड यांनी रोबोटिक्स प्रोग्रामिंग, कल्पेश पाटील यांनी रोबोटिक्स सिस्टीम,डॉ.ए.डी. विखर यांनी रोबोट कम्युनिकेशन प्रोटोकॉल,डॉ.किरण भोळे यांनी रिसेन्ट अड्वान्सेस इन अडेटिव्ह मॅनुफॅक्टरइजिंग,डॉ.पी.एम.सोळंखी यांनी पीएलसी सिस्टिम,डॉ.ए.डी.बागुल यांनी इंटरफेस रोबोट- पीएलसी रोबोटिक्स अप्लिकेशन,आनंद बंग यांनी एआय इन रोबोट्स, विकी वखरे यांनी रोबोट ऑटोमेशन, डॉ.सुनील कदम यांनी इंडस्ट्री ४. ० आणि सचिन पाटील यांनी ऑप्टिमिझेशन ऑफ इंडस्ट्रियल रोबोट या विषयावर मार्गदर्शन केले. या सर्व व्याख्यानांचा देशभरातील सहभागी प्राध्यापकांनी लाभ घेतला. शैक्षणिक अधिष्ठाता प्रा.संदीप येवले, अधिष्ठाता डॉ.डी.पी.क्षीरसागर व सर्व विभागप्रमुख उपस्थित होते.समन्वयक म्हणून मेकॅनिकल विभागप्रमुख डॉ.एच.यू. पवार व मेकॅट्रॉनिक्स विभागप्रमुख डॉ. एच.एस.राणे यांनी काम पाहिले.विद्यार्थी विकास अधिष्ठाता डॉ.ए.बी. भाने, प्रा.टी. व्ही.गुजराथी, प्रा.एच.आर.आहेर,प्रा. एस. जी. सावंत,प्रा. पी.आर. गोरे यांनी आयोजन केले.संस्थेचे अध्यक्ष नरेंद्र दराडे, आमदार किशोर दराडे,संचालक रुपेश दराडे यांनी या उपक्रमाचे कौतुक केले.

# मातोश्री फार्मसी महाविद्यालयात फोर्मुलेशन आणि थ्री डी प्रिंटिंग तंत्रज्ञानाचा आविष्कार!

**दै. आवाज वृत्तसेवा...**

लक्ष्मण घुगे राजापूर प्रतिनिधी : एकलहरे येथील मातोश्री शिक्षण संस्था संचलित मातोश्री फार्मसी महाविद्यालयात फोर्मुलेशन आणि थ्री डी प्रिंटिंग तंत्रज्ञान या विषयावर अविष्कार स्पर्धा संपन्न झाली.यात विद्यार्थ्यांनी नव्या तंत्रज्ञानावर आधारित प्रकल्प सादर करून नाविन्यपूर्ण अविष्कार सादर केले. सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ निर्देशानुसार नवीन संकल्पना आणि संशोधनाची आवड निर्माण करण्यासाठी महाविद्यालय स्तरावर आविष्कार संशोधन स्पर्धा आयोजित करण्यात आली.या स्पर्धेत फोर्मुलेशन आणि थ्री डी प्रिंटिंग तंत्रज्ञानाची उपयोगिता या विविध विषयांवर आधारित बी फार्मसी व एम फार्मसीच्या ८२ विद्यार्थ्यांनी संशोधन प्रकल्प सादर करून स्पर्धेत सहभाग नोंदविला. स्पर्धेचे उद्घाटन धानोरे येथील मातोश्री फार्मशी महाविद्यालयाचे विभाग प्रमुख डॉ.पवन आव्हाड व ग्लेनमार्क फार्मासुटिकल कंपनीचे वरिष्ठ संशोधक हर्षद धामणे यांच्या हस्ते झाले. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. प्रशांत मालपुरे यांनी संशोधन क्षेत्रातल्या संधी तसेच विद्यार्थ्यांना शैक्षणिक व संशोधन क्षेत्रात कार्यरत राहावे असे मार्गदर्शन केले. स्पर्धेचे बाह्य परीक्षक म्हणून उपस्थित असलेले डॉ.पवन आव्हाड यांनी विद्यार्थी व शिक्षकांना संशोधन क्षेत्रातील संधीविषयी मार्गदर्शन केले. विद्यार्थ्यांकडे संयम व चिकाटी हवीच पण योग्य मार्गदर्शन हे यशाचे गुपित असल्याचे स्पष्ट केले. श्री. धामणे यांनी औषधनिर्माण शास्त्र क्षेत्रात नाविन्यपूर्ण संशोधन करण्यासाठी मार्गदर्शन केले.

महाविद्यालयाच्या संशोधन समन्वयक म्हणून वर्षा चौधरी यांनी या स्पर्धेचे नियोजन केले. स्पर्धेसाठी संस्थेचे अध्यक्ष आमदार किशोर दराडे व सचिव कुणाल दराडे यांचे मार्गदर्शन लाभले. सूत्रसंचालन दिपाली हिवाळे व समीक्षा शेवाळे यांनी केले. आभार रागिणी पाटील, योजना कुऱ्हाडे यांनी केले. पराग कोठावदे, श्वेता झाल्टे, श्रद्धा भावसार, सुरेखा पाटील,दिपाली जोशी, सुप्रिया भामरे आदींनी नियोजन केले.

# कोळपेवाडीतील विद्यार्थ्यांच्या विज्ञान नाटिकेची राज्यस्तरावर निवड

**दै. आवाज वृत्तसेवा...**



कोळपेवाडी प्रतिनिधी:- नगर येथील सेंट सेव्हिअर्स हायस्कूल येथे अखिल भारतीय विज्ञान नाट्योत्सव जिल्हास्तरीय स्पर्धा मोठ्या उत्साहात पार पडली. या स्पर्धेत रयत शिक्षण संस्थेचे, श्री छत्रपती शिवाजी विद्यालय, मौजे सुरेगाव कोळपेवाडी येथील विद्यार्थ्यांनी अतिशय उत्कृष्ट कामगिरी करीत जिल्हास्तरावर प्रथम क्रमांक पटकावून राज्यस्तरीय स्पर्धेसाठी पात्रता मिळवली आहे. हे विद्यालयासाठी तसेच संपूर्ण परिसरासाठी अभिमानाचे यश आहे. या नाट्यस्पर्धेत विद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी डिजिटल भारत - बदलती दुनिया या विषयावर उत्कृष्ट नाटिका सादर केली. आधुनिक तंत्रज्ञानाचा समाजावर होणारा परिणाम, त्यातील सकारात्मक बदल आणि डिजिटल भारताची ताकद यांचे जिवंत चित्रण विद्यार्थ्यांनी आपल्या अभिनयातून रंगवले. या नाटिकेची तयारी व स्क्रिप्ट लेखन विद्यालयाचे गुरुकुल प्रमुख योगेश सावळा यांनी केले. अदिश कोळपे, साई शेलार, साहिल सोनवणे, श्रेयश खर्डे, ओंकार मस्के, सुनील साळवे, सारीपूत्त घेगडे, देवेंद्र अहिरे तसेच वादक - हर्षल ब्राह्मणे. या सर्व विद्यार्थ्यांनी उत्तम अभिनय करून विद्यालयाचे नाव उज्ज्वल केले. या अभिमानास्पद यशाबद्दल रे शिक्षण संस्थेचे उत्तर विभागाचे अध्यक्ष, आमदार आशुतोष अशोकराव काळे, रयत संकुलाचे प्राचार्य प्रकाश चौरे, गट शिक्षणाधिकारी - शबाना शेख , उपमुख्याध्यापक देविदास माने, पर्यवेक्षक सच्चिदानंद झावरे, स्थानिक स्कूल कमिटी पदाधिकारी, सर्व शिक्षक वृंद, तसेच सर्व पालकवर्ग यांनी सहभागी विद्यार्थी व मार्गदर्शक शिक्षक यांचे अभिनंदन करून शुभेच्छा दिल्या. डिजिटल भारत - बदलती दुनिया या विषयावर सादर केलेल्या या नाटिकेने कोळपेवाडी विद्यालयाचा लौकिक अधिक उज्वल केला आहे!

हे पत्रक मालक, मुद्रक, संपादक, प्रकाशक, भगवान नामदेव सोनवणे यांनी शार्प ऑफसेट, मालेगांव बस स्टँड समोर, मालेगांव येथे छापून ढासे मळा, सावता नगर, नांदगांव ता.नांदगांव, जि.नाशिक येथे प्रकाशित केले. सहसंपादक भाऊसाहेब हुजबंद (८९९९९२१९९४). या अंकात प्रसिध्द झालेल्या बातम्या, लेख, जाहिराती यामधून व्यक्त झालेल्या मतांशी मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक, सहसंपादक सहमत असतीलच असे नाही. मुद्रण दोष संभवनीय. (नांदगांव न्यायकक्षेत) सर्व अधिकार सुरक्षित. मो. ९५४५९१०१७७ - ९२७२४५३९२१ email : nandgaonawaz@gmail.com

# पाटोद्यात झेंडूच्या फुलांना समाधानकारक भाव

**दै. आवाज वृत्तसेवा...**

दिपक ढोकळे, पिंपळगाव लेप : प्रतिनिधी अतिवृष्टीच्या पावसाचा पिकांना मोठ्या प्रमाणात फटका बसला तसा तो झेंडूच्या फुलांनाही बसला आहे. त्यामुळे ऐन नवरात्रोत्सवात जिल्ह्यातील शेतकऱ्यांकडून होणारी झेंडूच्या फुलांची आवक घटली आहे.गणेशोत्सवामध्ये ज्या झेंडूच्या फुलाने शेतकऱ्याला अच्छे दिन पाहायला दिले, त्याच झेंडूच्या फुलाने अतिवृष्टीच्या पावसामुळे शेतकर्याच्या डोळ्यात पाणी आणलं आहे.परिणामी दसऱ्याच्या तोंडावर झेंडूच्या फुलांचे दर वाढल्याने शेतकरी काही प्रमाणात सुखावला आहे.



दसऱ्याच्या मुहूर्तावर येवला तालुक्यातील पाटोदा येथील प्रगतिशील शेतकरी ज्ञानेश्वर पगार यांनी झेंडूची फुले विक्रीसाठी आणली होती.तर त्यांना ९० ते १००किलोचा भाव मिळाल्याने त्यांनी समाधान व्यक्त केले आहे.बाजारपेठेत शेतकरी आपला फुलांचा माल विक्रीसाठी घेऊन आले होते.ओल्या फुलांना कमी प्रमाणात भाव मिळाला असून कोरड्या आणि चांगल्या प्रतीच्या फुलाला १०० ते १२० रू. किलो असा भाव मिळाला आहे.दसऱ्याच्या सणाला सर्वाधिक मागणी झेंडू,शेवंती,गुलछडी आणि अष्टर या फुलांना असते.फुले खरेदी करण्यासाठी नागरिकांनी बाजारपेठेत चांगली गर्दी केली होती.

# इतर मागास बहुजन कल्याण विभागांतर्गत शासकीय वसतिगृह प्रवेशासाठी २६ ऑक्टोपर्यंत मुदतवाढ

**दै. आवाज वृत्तसेवा...**

नाशिक (जिमाका वृत्तसेवा): इतर मागास बहुजन कल्याण विभागांतर्गत शासकीय वसतिगृह, पंडित दीनदयाल उपाध्याय स्वयंम योजना व ज्ञानज्योती सावित्रीबाई फुले आधार योजनेंतर्गत वसतिगृह प्रवेशासाठी २६ ऑक्टोबर २०२५ पर्यंत मुदतवाढ मिळाली आहे. इयत्ता १२ वी नंतर बिगर व्यावसायिक व व्यावसायिक अभ्यासक्रमासाठी प्रवेश घेतलेल्या पदवी अभ्यासक्रम व पदव्युत्तर अभ्यासक्रमासाठी जिल्हास्तरीय व तालुकास्तरीय महाविद्यालयांमध्ये प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांनी https://hmas.mahait.org या संकेतस्थळावर २६ ऑक्टोबरपर्यंत अर्ज सादर करावेत, असे आवाहन इतर मागास बहुजन कल्याण विभाग नाशिकचे सहायक संचालक संतोष चव्हाण यांनी प्रसिद्धी पत्रकान्वये केले आहे. विद्यार्थ्यांनी केवळ संकेतस्थळावर ऑनलाइन अज सादर करावेत. कोणतेही ऑफलाईन अर्ज कार्यालयात सादर करू नयेत, असे प्रसिद्धी पत्रकात नमूद केले आहे.

# माहिती अधिकार कायदा माहिती मिळवण्यासाठी त्रास देण्यासाठी नाही - अशोक सब्बन

## अहिल्यानगर जिल्हापरिषद येथे माहिती अधिकार दिन संपन्न

**दै. आवाज वृत्तसेवा...**

कोळपेवाडी/अहिल्यानगर:- प्रतिनिधी - जिल्हापरिषदेच्या छ. शिवाजी महाराज सभागृह येथे आयोजित माहिती अधिकार अधिनियम २००५ या कायद्याची सविस्तर माहिती देतांना व्याख्येते व भारतीय जनसंसदेचे अशोक सब्बन यांनी प्रतिपादन केले.

माहिती अधिकाराचा हक्क व अधिकार आम जेनतेला मिळण्यासाठी मा. अण्णा हजारे यांच्या नेतृतवाखाली सुमारे ८,९ वर्ष सतत फार मोठ्या कालावधीत सत्याग्रह आंदोलन करून राज्य सरकार व केंद्र सरकारांवर जनमताचा दबाव टाकून माहितीचा अधिकार कायदा, २००५ (ठढख -लीं, २००५) हा नागरिकांना माहिती मिळवण्यासाठीचा अधिकार देणारा कायदा पारित करून घेण्यात आला. माहिती अधिकाराचा कायदा हा आम जनतेच्या हातात असलेला एकमेव क्रांतीकरक कायदा आहे ज्या कायद्याची अम्मलबजावणीजनताकरतआहेतरपालन शासन, प्रशासन, लोकसेवक करीत आहे शासन प्रशासन व जनता यांच्या परस्पराच्या सहकार्याने निस्वर्थ भावनेने देश हित, समाज हित डोळ्यपुढे ठेऊन कार्य झाला तर पारदर्शक शासन व्यवस्था निर्माण होण्यास वेळ लागणार नाही. बहुसंख्य शासकीय कार्यालया मध्ये सद्य परिस्थितीत कार्यालयीन कामकाजाच्या अभिलेखा सोईस्कर,सुटसुटी, तात्काळ उपलब्ध होतील अशा स्वरूपात उपल्ब्ध होत नाहीत. कर्मचारी संख्या पुरेशी नाही अतिरिक्त कामाचा बोजा,ताण उपलब्ध कर्मचाऱ्यांवर आहे तसेच कामचुकारपणा, जबाबदारीचेभान न ठेवणे अशा काही प्रवृती मुळे माहिती अधिकारा अंतर्गत अडथळे निर्माण होत आहेत.यातून तडजोडी करण्याकडे कर्मचाऱ्यांचा भर




दिसून येतो. अशा कारणामुळे सद्य स्थितीत कायदा बदनाम होत आहे. राज्यकारभारात, पादर्शकता, उत्तरदायीत्व, जनतेचा सहभाग या उद्त्त हेतूला हरताळ फासून कायद्याचा वापर स्वतःच्या स्वार्थासाठी वापरणारा एक वर्ग निर्माण झाला आहे त्या वर्गाच्या गैरवर्तणूकीमुळे कायदा मोठ्याप्रमाणात बदनाम होत असून सरकार कायद्याची शक्ती कमी करत आहे अशी शक्ती कमी करण्या विरोधात मात्र माहिती अधिकार कायद्यात काम करणारणारे कार्यकर्ते आवाज उठवून कोणते सत्याग्रह आंदोलन केल्येच निर्दशनास येत नाही म्हणजेच अशा कार्यकत्याचा हेतू शुध्द नाही असे निर्दशनास येते. गैरवापर करणाऱ्यां मुठभरामुळे शासकीय यंत्रणेत कमालीची अस्वस्था आहे.

कधी कधी कोणी त्याचा गैरवापर करून किंवा वारंवार अर्ज,आपिल,तक्रारी करून शासकीय अधिकारी किंवा खाजगी व्यक्तींना छळ करण्याचा प्रयत्न करू शकतो त्या वेळी अशा छळा पासून कायदेशीर मुक्तता मिळवता येते. अशा परिस्थितीत न्यालयाच्या विविध प्रकरणा मध्ये न्यायालयाने दिलेले निर्देश, निर्णयाच्या आधारे त्रास देणाऱ्यावर कायदेशीर कारवाई होऊ शकते. जर अर्ज,अपील स्पष्टपणे गैरवापराचे असेल, तर माहिती अधिकारी (झखज) किंवा माहिती आयोग अर्ज फेटाळू शकतो.धमकावणे, घाबरवणे, अपमानीत भषा वापरणे, छळ करण्याचा हेतू ठेऊन अर्ज करणे इ. बाबद सतत त्रास दिल्यास संबंधित व्यक्तीवर भारतीय दंड संहितेच्या (IPC) ५०३, ५०६, ५०९ कलमांनुसार कारवाई होऊ शकते. जर कोणी शासकीय कर्मचाऱ्याला कामात अडथळा आणत असेल, तर खझउ १८६ नुसार कारवाई होऊ शकते. तसेच राज्य माहिती आयोग किंवा केंद्रीय माहिती आयोग त्याच्या अधिकारात त्रास देण्याच्या हेतूने किंवा व्यर्थ अर्ज मानून असे अर्ज नाकारू शकतात. काही ठिकाणी आयोगाने अशा व्यक्तींवर दंड लावलेलेही उदाहरणे आहेत. जसे माहिती घेण्याचा जनतेला अधिकार प्रदान केला गेला तसेच ,शाशकीय यंत्रणेला संरक्षणाचे उपाय सुध्दा दिले गेले आहेत जर एखाद्या अधिकाऱ्याला किंवा खाजगी व्यक्तीला सतत माहिती अधिकार कायद्याच्या माध्यमातून सतत हेतूपुरस्परत्रास देणे, छळ होत असेल, तर ते लेखी तक्रार वरिष्ठ अधिकारी, माहिती आयोग,पोलीस ठाणे येथे करू शकतात. न्यायालयातही रिट पिटीशन दाखल करून दिलासा मिळवता येतो.या संदर्भात न्यायालयीन निर्णय उदाहरणे (केस लॉ) अभ्यासता येतील. माहिती अधिकार आयोगाचे अनेक निर्णय राज्यात गैरवापर करून त्रास देणाऱ्यावर कारवाई झाली आहे?त्या मुळेमाहिती अधिकार कायद्याची कर्मचाऱ्यांनी भीती न बाळगता अधिका अधिक माहिती कायद्यातील स्वयंस्फूर्तीने जाहिर करावयाची माहिती जाहिर केली म्हणजे नागरीकांना माहिती घेण्यासाठी सर्रास अर्ज करण्याची गरजच पडणार नाही. या कार्यक्रमाचे स्वगत उप शिक्षण अधिकारी श्रमती मीना शिवगुंडे यांनी केले ,सुत्रसंलन सोमेश्वर मोरे यांनी केले आभार प्रदर्शन महेद्र आंधळे यांनी केले सदर कार्यक्रमास जिल्हापरीषदेतील विविध विभागातील अधिकारी, कर्मचारी मोठ्या प्रमाणात आवर्जून उपस्थित होते.

# स्वस्थ नारी, सशक्त परिवार: महिलांचे आरोग्य, राष्ट्राची प्रगती

**दै. आवाज वृत्तसेवा...**

महिला ह्या कोणत्याही कुटुंब आणि समाजाचा आधारस्तंभ आहेत. त्या केवळ कुटुंबाची काळजी घेत नाहीत, तर देशाच्या सामाजिक आणि आर्थिक प्रगतीमध्येही त्यांचे योगदान महत्त्वाचे आहे. जेव्हा एक महिला निरोगी आणि सक्षम असते, तेव्हा संपूर्ण कुटुंबाला बळ मिळते आणि त्यातूनच एक सशक्त कुटुंब व सशक्त राष्ट्र उभे राहते. याच विचारातून, केंद्र सरकारच्या आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्रालयाने आणि महिला व बाल विकास मंत्रालयाने एकत्रितपणे 'स्वस्थ नारी, सशक्त परिवार' ही विशेष मोहीम सुरू केली आहे.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या ७५ व्या वाढदिवसानिमित्त १७ सप्टेंबर रोजी सुरू झालेली ही मोहीम २ ऑक्टोबर रोजी महात्मा गांधी जयंतीपर्यंत चालणार आहे. या अभियानाचा मुख्य उद्देश महिलांच्या आरोग्याला सर्वोच्च प्राधान्य देणे हा आहे.

आरोग्याचा पाया: महिलांच्या आरोग्याकडे लक्ष देण्याची गरज

आपल्या कुटुंबाची काळजी घेताना महिला अनेकदा स्वतःच्या आरोग्याकडे दुर्लक्ष करतात. यामुळे त्यांना अनेक आरोग्य समस्यांचा सामना करावा लागतो, जसे की पौष्टिक आहाराची कमतरता, अशक्तपणा, जीवनसत्त्वांची कमतरता आणि मानसिक ताण-तणाव. ही समस्या आजही ग्रामीण तसेच शहरी भागातील महिलांसाठी एक मोठे आव्हान आहे. यावर मात करण्यासाठी 'स्वस्थ नारी, सशक्त परिवार' अभियानांतर्गत देशभरात, विशेषतः ग्रामीण आणि आदिवासी भागांत, लाखो महिलांना आरोग्य सुविधा पुरवल्या जात आहेत.

या अभियानांतर्गत आयुष्यमान आरोग्य मंदिरे, प्राथमिक आरोग्य केंद्रे (झकउ) आणि अंगणवाड्यांमध्ये विशेष तपासण्या, लसीकरण आणि आरोग्यविषयक समुपदेशन उपलब्ध आहे. आरोग्य विभागामार्फत कुटुंबातील महिलांना या सुविधांचा लाभ घेण्यासाठी प्रोत्साहन दिले जात आहे, जेणेकरून त्या त्यांच्या आरोग्याकडे अधिक लक्ष देतील.

प्रमुख आरोग्य तपासण्या आणि उपचार

या अभियानाचा एक महत्त्वाचा पैलू म्हणजे महिलांच्या आरोग्याशी संबंधित दीर्घकालीन सामाजिक बदल घडवून आणणे. यासाठी उच्च रक्तदाब, मधुमेह, स्तन आणि गर्भाशयाचा कर्करोग यांसारख्या गंभीर आजारांची मोफत तपासणी केली जात आहे.

याशिवाय क्षयरोग, कुष्ठरोग, निमिया आणि सिकल सेल निमिया यांसारख्या रोगांचीही लवकर आ-ळख पटवून त्यांच्यावर तातडीने उपचार सुरू केले जात आहेत.

गर्भवती महिलांसाठी हिमोग्लोबिन तपासणी, लसीकरण आणि प्रसूतीपूर्व काळजी या सुविधा उपलब्ध आहेत. 'जननी शिशु सुरक्षा योजना' आणि 'जननी सुरक्षा योजना' यांसारख्या योजनांमधून माता-शिशू मृत्यूदर कमी करण्यावर विशेष भर दिला जात आहे. याशिवाय पोषण आणि जनजागृती सत्रांद्वारे संतुलित आहार, स्वच्छता आणि कुटुंब नियोजनाचे महत्त्व समजावून सांगितले जात आहे.

'स्वस्थ नारी, सशक्त परिवार' या मोहिमेमुळे महिलांना केवळ मोफत आरोग्य सेवाच मिळत नाही, तर त्या आरोग्य साक्षरही होत आहेत. यामुळे महिलांचे आरोग्य सुधारेल, ज्यामुळे त्यांचे कुटुंब सशक्त होईल आणि राज्याचा एकूण आरोग्य निर्देशांक वाढेल. हा निर्देशांक वाढविण्यासाठी ही मोहीम निश्चितच फायदेशीर ठरेल, यात शंका नाही.

हा उपक्रम केवळ आरोग्य सेवा पुरवण्यापुरता मर्यादित नाही, तर तो महिलांना अधिक सक्षम बनवून राष्ट्रनिर्मितीत त्यांचे योगदान वाढवण्याच्या दिशेने टाकलेले एक महत्त्वाचे पाऊल आहे. जेव्हा महिला निरोगी असतील, तेव्हाच एक सक्षम आणि प्रगतशील समाज निर्माण होईल.

०००

**मनोज सुमन शिवाजी सानप,**
**जिल्हा माहिती अधिकारी, ठाणे**

# पारनेर - सुपा औद्योगिक वसाहतीच्या विकासासाठी प्रशासनाने सहकार्य करावे - उपमुख्यमंत्री अजित पवार

**दै. आवाज वृत्तसेवा...**

अहिल्यानगर, दि. ०२: राज्यातील उद्योग क्षेत्राचा जास्तीत जास्त विकास करून रोजगार निर्मितीला शासन प्राधान्य देत आहे. उद्योजकांना संरक्षण देणे हे शासनाचे कर्तव्य असून, पारनेर - सुपा औद्योगिक वसाहतीच्या विकासासाठी प्रशासनाने उद्योजकांना सर्वोतोपरी सहकार्य करावे, असे निर्देश उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी दिले.

उद्योजकांनी कुठल्याही दबावाला बळी न पडता आपले काम करण्याचे आवाहन त्यांनी केले.उपमुख्यमंत्री पवार हे पारनेर येथील शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थेत पारनेर - सुपा औद्योगिक वसाहतीमधील विविध विषयासंबंधी आयोजित आढावा बैठकीत बोलत होते.

बैठकीस आमदार काशीनाथ दाते, जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया, जिल्हा पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी आनंद भंडारी, औद्योगिक विकास महामंडळाचे विभागीय अधिकारी गणेश राठोड, जिल्हा उद्योग केंद्राचे उद्योग अधिकारी अशोक बेनके, जिल्हा व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण अधिकारी सुनील शिंदे, कौशल्य विकास विभागाचे सहाय्यक आयुक्त रविकुमार पंतम आदी उपस्थित होते.

उपमुख्यमंत्री पवार म्हणाले, उद्योगासाठी शासनाचे नेहमीच सकारात्मक धोरण राहिले आहे. पारनेर - सुपा औद्योगिक क्षेत्रातील उद्योजकांना कुठल्याही प्रकारचा त्रास होणार नाही, याची पोलीस प्रशासनाने काळजी घ्यावी. उद्योजकांना वेठीस धरून दबाव टाकणाऱ्यांवर कठोर कारवाई करण्यात यावी.

औद्योगिक वसाहतीमध्ये कायदा व सुव्यवस्था अबाधित राहील, यासाठी पोलीस विभागाने अधिक कार्यक्षम व दक्षतेने काम करावे. उद्योग टिकून राहावेत यासाठी उद्योजकांनीही कामगारांना उद्योगामध्ये सामावून घेण्याचे आवाहन केले.

बैठकीत उपस्थित उद्योजकांनी त्यांच्या अडचणी उपमुख्यमंत्री पवार यांच्यासमोर मांडल्या. संबंधित विभागाचे प्रमुख अधिकारी व उद्योजक देखील उपस्थित होते.

# सामान्य जनतेची गर्दी जमवून 'त्यांची' होते मजा, चेंगराचेंगरीत जीव गमावण्याची मात्र मिळते सजा

**दै. आवाज वृत्तसेवा...**

दिनांक २७ सप्टेंबर २०२५ तामिळनाडूसह देशासाठी अत्यंत दु:खद व अंगावर शहारे येणारा दिवस ठरला.राजकिय पुढारी आपल्या स्वार्थासाठी मोठ्या प्रमाणात गर्दी जमा करतात.परंतु त्याचा काय विपरीत परिणाम होतो ही बाब राजकीय पुढाऱ्यांना नेहमीच विसर पडतो. कारण जेव्हा कोणतीही गर्दी आवाक्या बाहेर जाते तेव्हा चेंगराचेंगरी हमखास होण्याची दाट शक्यता असते आणि हीच मोठी व भयावह चुक तामिळनाडू करूर येथे दिसून आली आणि याचे प्रायश्चित्त शोककळेत पसरले.अभिनेता व तामिळगा वेत्री कळघम (टीव्हीके) या पक्षाचे अध्यक्ष विजय यांच्या तामिळनाडूतील करूर येथील सभेत दिनांक २७ सप्टेंबर २०२५ ला चेंगराचेंगरी होऊन ४० लोकांचा मृत्यू झाला तर १०० हून अधिक गंभीररित्या जखमी झालेत.या मृतांमध्ये ८ लहान मुले आणि १६ महिलांचा समावेश आहे.या घटनेने संपूर्ण देश स्तब्ध झाला.राजकीय पुढारी आपले वर्चस्व प्रस्थापित करण्यासाठी व स्वतः च्या स्वार्थासाठी लाखोंच्या संख्येने भिड जमा करतात व त्याचे प्रायश्चित्त सभेला येणाऱ्या भोळ्याभाबड्या जनतेनी भोगावे लागते याला कितपत योग्य म्हणावे! राजकिय पुढारी गर्दीचे अवलोकन का करीत नाही? जास्त गर्दी झाली तर याचे काय दुष्परिणाम होऊ शकतात याकडे राजकीय पुढाऱ्यांची, स्थानिक प्रशासन व राज्य सरकारांची नजर का जात नाही? देशातील बहुतेक चेंगराचेंगरीच्या घटना ह्या आ बैल मुझे मार अशा प्रकारच्या असतात.याचे दु:ख संपूर्ण परिवाराला भोगावे लागते.त्यामुळे भोळ्याभाबड्या जनतेनी व सर्वसामान्यांनी अशा सभांपासुन सावधगिरी बाळगली पाहिजे.कारण याचे दु:ख संपूर्ण देशाला सुध्दा होते व सर्वत्र हळहळ व्यक्त केली जाते कारण ही घटना अंगावर शहारे येणारी असते.राजकीय पुढारी बेशरमीची हद पार करतात.कारण करूर येथे विजय यांच्या प्रचारसभेला प्रचंड गर्दी झाली होती.सभेसाठी हजारो समर्थक सकाळपासूनच रांगेत उभे होते. उन्हाच्या झळांनी व प्रचंड गर्दीमुळे अनेकजण बेचैन होवू लागले व घबराट निर्माण झाली या बेचैनी दरम्यान अनेक जण बेशुद्ध पडू लागले व याचेच रूपांतर चेंगराचेंगरीमध्ये होवून अनेकांना आपला प्राण गमवावा लागला.भारतात दिवसेंदिवस चेंगराचेंगरीच्या घटना वाढणे ही अत्यंत गंभीर व चिंताजनक बाब आहे.यावर राजकीय पुढारी, स्थानिक प्रशासन, राज्य सरकारे व केंद्र सरकारने जातीने लक्ष देण्याची गरज आहे.तामिळनाडु सारखी भयावह घटना यापूर्वी दिनांक ३ जून २०२५ ला रॉयल चॅलेंजर्स बंगळुरू टिमने आयपीएलची मॅच १८ वर्षांनंतर जिंकून इतिहास घडविला यासाठी दिनांक ४ जून २०२५ ला बंगळुरू टिमने मॅच जिंकण्याची खुशी साजरी करण्यासाठी चिन्नास्वामी स्टेडियमवर भव्य आयोजन करण्यात आले होते.परंतु या स्टेडियमच्या मैदानाची क्षमता फक्त ३५ हजार असतांना मर्यादेपेक्षा जास्त म्हणजे ३ लाखांपेक्षा जास्त लोक जमले होते यामुळे मैदानाबाहेर मोठ्या प्रमाणात चेंगराचेंगरी होऊन ११ लोकांचा मृत्यू झाला होता व ३० पेक्षा अधिक लोक गंभीररीत्या जखमी झाले होते.ही अत्यंत दुर्दैवी आणि अंगावर शहारे येणारी घटना चिन्नास्वामी स्टेडियमच्या परिसरात पहायला मिळाली होती व मोठ्या जल्लोष चेंगराचेंगरीचे गालबोट लावुन गेला.ही घटना कर्नाटक प्रशासन व कर्नाटक क्रिकेट असोसिएशन यांच्या निष्काळजीपणामुळे झाल्याचे त्यावेळेस स्पष्ट दिसून आले होते.त्याचीच पुनरावृत्ती आपल्याला तामिळनाडूतील करूर येथील टीव्हीके पक्षाच्या सभेत दिसून आली.तामिळनाडूतील करूर येथील भयावह घटना का व कशी घडली याची न्यायालयीन कठोर चौकशी व्हायला पाहिजे व या भयावह घटनेला जबाबदार असणाऱ्या संपूर्ण राजकीय पुढाऱ्यांवर कायद्याच्या माध्यमातून लगाम कसली पाहिजे.कारण तामिळनाडूतील ही धक्कादायक घटना मानवतेला मोठी गंभीर जखम करणारी घटना आहे. अभिनेता व तामिळगा वेत्री कळघम (टीव्हीके) या पक्षाचे अध्यक्ष विजय यांची या घटनेबद्दल जितकी निंदा कराल तितकी कमीच आहे. केंद्र सरकार,संपूर्ण राज्य सरकार व स्थानिक प्रशासन यांना विनंती करतो की तामिळनाडूतील करूर सारख्या घटना लक्षात घेता अशाप्रकारच्या घटना भविष्यात पुन्हा उद्भवणार नाही याची जातीने खबरदारी घ्यावी. तामिळनाडूतील करूर येथे झालेली घटना अत्यंत दुर्दैवी आणि दु:खद आहे.मृत्यूमुखी पडलेल्यांच्या प्रती श्रद्धांजली अर्पण करतो व त्यांच्या परिवाराला या घटनेपासुन सावरण्याची ईश्वर शक्ती प्रदान करो हीच ईश्वरचरणी प्रार्थना.



**रमेश लांजेवार (प्रदेश प्रवक्ता) (महाराष्ट्र कलाल–कलार समाज संघटना) मो.नं.९९२१६९०७७९, नागपूर.**

# राष्ट्रीय नवरात्र उत्सवानिमित्त नांदगावात श्री दुर्गामाता दौड संपन्न

**दै. आवाज वृत्तसेवा...**

नांदगाव (प्रतिनिधी) : श्री शिवप्रतिष्ठान हिंदुस्थानच्या वतीने नांदगाव शहरात राष्ट्रीय नवरात्र उत्सव निमित्ताने दरवर्षीप्रमाणे यावर्षीही श्री दुर्गामाता दौड मोठ्या उत्साहात पार पडली. घटस्थापना दिनांक २२ सप्टेंबर पासून विजयादशमी अर्थात २ ऑक्टोबर पर्यंत शहरातील विविध भागांमध्ये या दुर्गामाता दौडीचे आयोजन करण्यात आले. दसऱ्याच्या दिवशी या दौडीचा समारोप शहरातील ग्रामदैवत श्री एकविरा माता मंदिर येथे करण्यात आला. गुरुवर्य श्री संभाजीराव भिडे (गुरुजी) यांच्या मार्गदर्शनाखाली ही दौड संपूर्ण महाराष्ट्रासह कर्नाटक, राजस्थान, गुजरात या विविध राज्यांमधून आलेल्या धारकऱ्यांच्या सहभागाने भव्य स्वरूपात पार पडली. दररोज पहाटे भगवा ध्वज हातात घेऊन भारतमाता, दुर्गामाता, गोमाता यांच्या जयघोषाने दौडीला प्रारंभ होत असे. मंदिरात पोहोचल्यावर धारकऱ्यांनी राष्ट्र, धर्म व समाज उन्नतीसाठी आईकडे प्रार्थना अर्पण केली. या प्रसंगी आई दार उघड आई दार उघड अशा घोषणांनी संपूर्ण परिसर दुमदुमून गेला होता. आगामी काळात होणाऱ्या धारातीर्थ यात्रा गडकोट मोहीमेत सहभागी होण्याचे आवाहन तालुकाप्रमुख सुमित सोळशे व शहरप्रमुख मयूर शिंदे यांनी उपस्थित शिवभक्तांना केले.



## गल्फ ऑइलतर्फे नाशिकमध्ये चाय– पकोडा राइड २०२५ चा शुभारंभ

**दै. आवाज वृत्तसेवा...**

नाशिक– गल्फ ऑइल ल्युब्रिकंट्स इंडिया लिमिटेड या भारतातील आघाडीच्या ल्युब्रिकंट ब्रँड्सपैकी एका ब्रँडने त्यांच्या लोकप्रिय चाय–पकोडा २०२५ राइडचा नाशिकमध्ये शुभारंभ केला. मुख्य प्रायोजक इंडिया बाइक वीक (आयबीडब्ल्यू) या आशियातील सर्वात मोठ्या मोटरसायकलिंग फेस्टिवलसह ही रेस आयोजित करण्याचे हे सलग तिसरे वर्ष आहे. या वर्षाच्या राइड्स परत एकदा मोटरसायकिंगच्या माध्यमातून साहस आणि सामाजिक भावनांना चालना देत आहे. गेल्या दोन वर्षांत या रेसला १२००० पेक्षा जास्त रायडर्स आणि २० पेक्षा जास्त शहरांतील मोटरसायकलप्रेमींचा प्रतिसाद मिळाला असून ही राइड देशातील बहुप्रतीक्षीत सामाजिक स्वरुपाचा बायकिंग अनुभव देणाऱ्यांपैकी एक ठरली आहे.यावर्षी नाशिकच्या राइडमध्ये १०० पेक्षा जास्त बायकर्स सहभागी झाले होते. नाशिकच्या ट्रीट हॉटेलपासून सुरुवात करत त्यांनी सुमा अडव्हेंचर पार्कपर्यंत ३० किमीचा प्रवास पूर्ण केला. साहस आणि एकत्रितपणाचा आनंद यामुळे ही राइड अविस्मरणीय ठरली. सुरक्षेवर भर देत गल्फने आयबीडब्ल्यू मार्शल्ससह प्री–राइड ब्रिफिंग आणि सेफ्टी ड्रिलचे आयोजन केले होते. मार्शल्सनी आघाडीवर राहात राइड सुरळीतपणे पार पडेल याची काळजी घेतली. प्रत्येक रायडरला सेफ्टी रायडिंग गियर देत ब्रँडने सुरक्षित व जबाबदार रायडिंगप्रती आपली बांधिलकी दर्शवली. या कार्यक्रमाची सांगता राइड संपल्यानंतर वेगवेगळे मजेदार उपक्रम आणि संवादी खेळातून झाली. मोटरसायकलिंगची१ एकत्रित संस्कृती दर्शवण्यासाठी खास क्षणांना उजाळा देण्यात आला.




श्री संत सेवालाल महाराज सेवाभावी संस्था, संचलित
श्री पिनाकेश्वर कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय
(पुणे विद्यापीठ संलग्न)
वसंतनगर, पो. जातेगाव, ता. नांदगाव, जि. नाशिक–४२३१०६

* शैक्षणिक वर्ष २०२५–२६ पासून
B.A./B.Com/B.Sc साठी प्रवेश देणे सुरू आहे.
प्रवेश पात्रता – १२ वी पास (आर्टस्, कॉमर्स, सायन्स)




* वैशिष्टे *
* उच्च शिक्षित प्राध्यापक वर्ग
* भव्य प्रशासकीय व महाविद्यालय इमारत
* सि.सि.टि.व्ही. कॅम्पस
* ग्रथालय व वाचनालय स्वतंत्र इमारत
* मुला–मुलींसाठी स्वतंत्र वसतीगृह सुविधा
* भव्य सेमिनार हॉल व खेळाचे मैदान
* मर्यादित विद्यार्थी संख्या

प्रवेशासाठी संपर्क :- ९९२२१७२७९९
पत्ता – कै. गंगाराम धनसिंग राठोड शैक्षणिक संकुल, महादेव रोड, वसंत नगर, पो.जातेगाव, ता. नांदगाव, जि. नाशिक.
* प्राचार्य :– मोबा. 9922172799

श्री संत सेवालाल महाराज सेवाभावी संस्था, संचलित
श्री पिनाकेश्वर कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय
(पुणे विद्यापीठ संलग्न)
वसंतनगर, पो. जातेगाव, ता. नांदगाव, जि. नाशिक–४२३१०६

प्रथम वर्ष पदवी अभ्यासक्रम प्रवेश प्रक्रिया
(राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२०) शैक्षणिक वर्ष २०२५–२६

पदवी अभ्यासक्रम

| | | |
|---|---|---|
| B.A. (Bachelor of Arts Specialization) | B.Sc. (Bachelor of Science Specialization) | B.Com. (Bachlor of Com-merce) |
| B.A. Eniglish | B.Sc. Chemistry | Business Administration |
| B.A. Marathi | B.Sc. Physics | Marketing |
| B.A. Hindi | B.Sc. Micro Biology | |
| B.A. History | B.Sc. Botany | |
| B.A. Geography | B.Sc. Zoology | |
| B.A. Economice | | |
| B.A. Politics | | |

प्रवेशासाठी खालील प्रमाणे कागदपत्रांची पुर्तता करणे आवश्यक असेल
१) ॲडमिशन फॉर्म
२) मुळ कागदपत्र (Orignal L.C.) व दोन स्वयंसाक्षांकित प्रती
३) गुणपत्रकाच्या दोन स्वयंसाक्षांकित प्रती
४) जातीचा दाखला व दोन स्वंयसाक्षांकित प्रती (आवश्यक असल्यास)
५) आधार कार्ड दोन स्वयंसाक्षांकित प्रती
६) शिक्षणात खंड असेल तर गॅप सर्टिफिकेट आपल्याकडे स्कॅन स्वरूपात ठेवावा.

टिपः महाविद्यालय सोडल्याचा मूळ दाखला सर्टिफिकेट आपल्याकडे स्कॅन स्वरूपात ठेवावा. सदर कागदपत्र शिष्यवृत्ती फॉर्म भरण्यासाठी आवश्यक आहे.

* अधिक माहितीसाठी संपर्क *
* प्राचार्य :– मोबा. 9922172799




